**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ____________________

(Name) ____________________

2. (Signature) ____________________

(Name) ____________________

**Answer Sheet No. :** ...............................................

(To be filled by the Candidate)

**Roll No.** | | | | | | | |

(In figures as per admission card)

**Roll No.** ____________________

(In words)

**Test Booklet No.**

**D—3807**

**PAPER—II**

# MARATHI

**Time : 1¼ hours]** **[Maximum Marks : 100**

Number of Pages in this Booklet : **16** Number of Questions in this Booklet : **50**

## Instructions for the Candidates

1. Write your roll number in the space provided on the top of this page.
2. This paper consists of fifty multiple-choice type of questions.
3. At the commencement of examination, the question booklet will be given to you. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as below :
   (i) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal and do not accept an open booklet.
   (ii) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to pages/questions missing or duplicate or not in serial order or any other discrepancy should be got replaced immediately by a correct booklet from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the question booklet will be replaced nor any extra time will be given.**
   (iii) After this verification is over, the Serial No. of the booklet should be entered in the Answer-sheets and the Serial No. of Answer Sheet should be entered on this Booklet.
4. Each item has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the oval as indicated below on the correct response against each item.

   **Example :** (A) (B) ⬤ (D)

   where (C) is the correct response.
5. Your responses to the items are to be indicated in the Answer Sheet given **inside the Paper I booklet only**. If you mark at any place other than in the ovals in the Answer Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done in the end of this booklet.
8. If you write your name or put any mark on any part of the test booklet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return the test question booklet to the invigilators at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table etc., is prohibited.**
12. **There is NO negative marking.**

## परीक्षार्थियों के लिए निर्देश

1. पहले पृष्ठ के ऊपर नियत स्थान पर अपना रोल नम्बर लिखिए।
2. इस प्रश्न-पत्र में पचास बहुविकल्पीय प्रश्न हैं।
3. परीक्षा प्रारम्भ होने पर, प्रश्न-पुस्तिका आपको दे दी जायेगी। पहले पाँच मिनट आपको प्रश्न-पुस्तिका खोलने तथा उसकी निम्नलिखित जाँच के लिए दिये जायेंगे जिसकी जाँच आपको अवश्य करनी है :
   (i) प्रश्न-पुस्तिका खोलने के लिए उसके कवर पेज पर लगी कागज की सील को फाड़ लें। खुली हुई या बिना स्टीकर-सील की पुस्तिका स्वीकार न करें।
   (ii) **कवर पृष्ठ पर छपे निर्देशानुसार प्रश्न-पुस्तिका के पृष्ठ तथा प्रश्नों की संख्या को अच्छी तरह चैक कर लें कि ये पूरे हैं। दोषपूर्ण पुस्तिका जिनमें पृष्ठ/प्रश्न कम हों या दुबारा आ गये हों या सीरियल में न हों अर्थात किसी भी प्रकार की त्रुटिपूर्ण पुस्तिका स्वीकार न करें तथा उसी समय उसे लौटाकर उसके स्थान पर दूसरी सही प्रश्न-पुस्तिका ले लें। इसके लिए आपको पाँच मिनट दिये जायेंगे। उसके बाद न तो आपकी प्रश्न-पुस्तिका वापस ली जायेगी और न ही आपको अतिरिक्त समय दिया जायेगा।**
   (iii) इस जाँच के बाद प्रश्न-पुस्तिका की क्रम संख्या उत्तर-पत्रक पर अंकित करें और उत्तर-पत्रक की क्रम संख्या इस प्रश्न-पुस्तिका पर अंकित कर दें।
4. प्रत्येक प्रश्न के लिए चार उत्तर विकल्प (A), (B), (C) तथा (D) दिये गये हैं। आपको सही उत्तर के दीर्घवृत्त को पेन से भरकर काला करना है जैसा कि नीचे दिखाया गया है।

   **उदाहरण :** (A) (B) ⬤ (D)

   जबकि (C) सही उत्तर है।
5. प्रश्नों के उत्तर **केवल प्रश्न पत्र I के अन्दर दिये गये** उत्तर-पत्रक पर ही अंकित करने हैं। यदि आप उत्तर पत्रक पर दिये गये दीर्घवृत्त के अलावा किसी अन्य स्थान पर उत्तर चिन्हांकित करते है, तो उसका मूल्यांकन नहीं होगा।
6. अन्दर दिये गये निर्देशों को ध्यानपूर्वक पढ़ें।
7. कच्चा काम (Rough Work) इस पुस्तिका के अन्तिम पृष्ठ पर करें।
8. यदि आप उत्तर-पुस्तिका पर अपना नाम या ऐसा कोई भी निशान जिससे आपकी पहचान हो सके, किसी भी भाग पर दर्शाते या अंकित करते हैं तो परीक्षा के लिये अयोग्य घोषित कर दिये जायेंगे।
9. आपको परीक्षा समाप्त होने पर उत्तर-पुस्तिका निरीक्षक महोदय को लौटाना आवश्यक है और परीक्षा समाप्ति के बाद अपने साथ परीक्षा भवन से बाहर न लेकर जायें।
10. **केवल नीले/काले बाल प्वाईंट पैन का ही इस्तेमाल करें।**
11. **किसी भी प्रकार का संगणक (कैलकुलेटर) या लाग टेबल आदि का प्रयोग वर्जित है।**
12. **गलत उत्तर के लिए अंक नहीं काटे जायेंगे।**

# MARATHI

## PAPER – II

## मराठी

## प्रश्नपत्रिका – II

**Note :** This paper contains **fifty** (50) objective-type questions, each question carrying **two** (2) marks. Attempt **all** of them.

**टीप :** या प्रश्नपत्रिकेत विविध विकल्प असलेले **पन्नास** (50) प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** (2) गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

**1.** पुढीलपैकी कोणत्या गटातील सर्व कादंबऱ्या भाऊ पाध्ये यांच्या आहेत?

(A) वासूनाका, अग्रेसर, बॅरिस्टर अनिरुद्ध धोपेश्वरकर, राडा

(B) वासूनाका, रात्र काळी घागर काळी, स्वामी, चक्र

(C) वासूनाका, झेप, बॅरिस्टर अनिरुद्ध धोपेश्वरकर, चक्र

(D) वासूनाका, वावटळ, वैतागवाडी, अजगर

**2.** पुढील नाटके आणि नाटककार यांच्या जोड्या लावा :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | शांतता कोर्ट चालू आहे | (i) | चिं.त्र्यं. खानोलकर |
| (b) | एक शून्य बाजीराव | (ii) | वसंत कानेटकर |
| (c) | अश्रूंची झाली फुले | (iii) | आचार्य अत्रे |
| (d) | भ्रमाचा भोपळा | (iv) | विजय तेंडुलकर |
| | | (v) | मो.ग. रांगणेकर |

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (A) | (iv), | (iii), | (v), | (i) |
| (B) | (iv), | (v), | (i), | (ii) |
| (C) | (iv), | (i), | (ii), | (iii) |
| (D) | (iii), | (iv), | (iii), | (i) |

3. बेगम बर्वे हे नाटक कोणी लिहिले आहे?

(A) प्रेमानंद गज्वी

(B) वसंत कानेटकर

(C) कृ.प्र. खाडिलकर

(D) सतीश आळेकर

4. चिं. त्र्यं. खानोलकर यांची 'कालाय तस्मै नम:', 'कोंडुरा', 'नक्षत्रांचे देणे' ही पुस्तके कोणत्या वाङ्मयप्रकारात मोडतात?

(A) सर्व नाटके

(B) अनुक्रमे नाटक, कांदबरी व कवितासंग्रह

(C) सर्व कवितासंग्रह

(D) अनुक्रमे कादंबरी, कथासंग्रह व कवितासंग्रह

5. मराठी कादंबरी वाङ्मयात पुढीलपैकी कोणते लेखक सध्या कार्यरत आहेत?

(A) श्याम मनोहर, अनंत सामंत, अरूण साधू

(B) श्याम मनोहर, श्री.ना. पेंडसे, अनंत सामंत

(C) रणजित देसाई, भाऊ पाध्ये, अनंत कदम

(D) मनोहर शहाणे, जयवंत दळवी, मधु मंगेश कर्णिक

6. पुढीलपैकी कोणत्या दोन ग्रंथाचे म्हाईंभट हे लेखक आहेत ?

(A) लीळाचरित्र, स्मृतिस्थळ
(B) लीळाचरित्र, दृष्टीत पाठ
(C) लीळाचरित्र, गोविंदप्रभु चरित्र
(D) लीळाचरित्र, वछाहरण

7. पुढील कादंबऱ्या आणि त्यांचे लेखक यांच्या जोड्या लावा :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | धग | (i) | शंकर पाटील |
| (b) | झेलझपाट | (ii) | र.वा. दिघे |
| (c) | सराई | (iii) | मधुकर वाकोडे |
| (d) | टारफुला | (iv) | उद्धव शेळके |
| | | (v) | आनंद यादव |

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (A) | (iv), | (iii), | (ii), | (i) |
| (B) | (iii), | (ii), | (i), | (iv) |
| (C) | (ii), | (i), | (iv), | (i) |
| (D) | (iv), | (i), | (v), | (ii) |

8. पुढीलपैकी कोणत्या कविता केशवसुतांनी लिहिल्या आहेत ?

(A) धर्मवीर, कविबाळे, खेड्यातील रात्र
(B) प्रेम आणि मरण, दसरा, गोफ
(C) हरपले श्रेय, फिर्याद, सृष्टि आणि कवि
(D) वनवासी फूल, कुणास्तव कुणीतरी, केवढे हे क्रौर्य

9. बाबा पदमनजी यांच्या ‘यमुनापर्यटन’ मधील नायिका कथानकाच्या अखेरीस कोणती कृती करते?

(A) समाजसेवेसाठी जीवन समर्पित करते

(B) सती जाते

(C) केशवपनास विरोध करते

(D) धर्मांतर करून पुनर्विवाह करते

10. ‘‘समकालीन समाजातील स्त्रियांचे प्रश्न आणि सामाजिक सुधारणांची आवश्यकता हे आशयसूत्र त्यांनी आपल्या कादंबऱ्यांतून फार जिव्हाळ्याने विकसित केले आहे’’ हे विधान पुढीलपैकी कोणत्या लेखकास लागू पडते?

(A) ना.सी. फडके (B) वि.स. खांडेकर

(C) हरी नारायण आपटे (D) रा.भि. गुंजीकर

11. उद्धव शेळके यांच्या कथांतून कोणता परिसर साकार झाला आहे?

(A) उत्तर आणि दक्षिण कोकणांतील ग्रामीण परिसर

(B) पश्चिम महाराष्ट्रातील ग्रामीण परिसर

(C) विदर्भ आणि वऱ्हाड येथील ग्रामीण परिसर

(D) मुंबईतील औद्योगिक परिसर

12. ना.सी. फडके यांची पहिली कादंबरी कोणती?

(A) दौलत (B) अल्ला हो अकबर

(C) कुहूकुहू (D) जादूगार

**13.** बी कवींचे पूर्ण नाव कोणते ?

(A) नारायण मुरलीधर गुप्ते

(B) कृष्णाजी केशव गुप्ते

(C) त्र्यंबक बापूजी गुप्ते

(D) हेमचंद्र सुभाष गुप्ते

**14.** 'लिलीचे फूल', 'दुर्दम्य' आणि 'प्रारब्ध' या कादंबऱ्यांचे लेखक कोण ?

(A) मधु मंगेश कर्णिक

(B) पु.शि. रेगे

(C) श्री.ना. पेंडसे

(D) गंगाधर गाडगीळ

**15.** 'छंद' या अनियतकालिकाचे संपादक कोण होते ?

(A) श्री.पु. भागवत (B) पु.शि. रेगे

(C) पु.आ. चित्रे (D) सदानंद रेगे

**16.** पुढील घटना कालानुक्रमाने लिहा.

(a) निबंधमालेची स्थापना

(b) बालकवींचा अपघाती मृत्यू

(c) केशवसुतांची पहिली कविता

(d) विष्णूदास भावे यांचा पहिला नाट्यप्रयोग

(A) a - d - b - c (B) d - a - c - b

(C) c - d - b - a (D) a - b - c - d

17. काव्याचे आत्मतत्त्व म्हणून रीतितत्त्वाचा पुरस्कार कोणी केला ?

(A) भामह (B) वामन

(C) दण्डी (D) क्षेमेंद्र

18. पुढील संकल्पना व त्यांचे पुरस्कर्ते यांच्या जोड्या लावा :

(a) औचित्य (i) आनंदवर्धन

(b) ध्वनी (ii) अभिनव गुप्त

(c) रस (iii) क्षेमेंद्र

(d) महारस (iv) विश्वनाथ

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (A) | (ii), | (iii), | (i), | (iv) |
| (B) | (iv), | (ii), | (iii), | (i) |
| (C) | (i), | (iv), | (ii), | (iii) |
| (D) | (iii), | (i), | (iv), | (ii) |

19. ''वैज्ञानिक व शास्त्रीय स्वरुपाच्या लेखनाची भाषा पूर्णपणे वस्तुनिष्ठ स्वरुपाची असते. ती नि:संदिग्ध व तर्कसंगत असावी अशी अपेक्षा असते''.

(A) वरील दोन्ही विधाने असत्य आहेत

(B) वरील दोन्ही विधाने सत्य आहेत

(C) वरीलपैकी पहिले विधान सत्य आहे, पण दुसरे असत्य आहे

(D) वरीलपैकी पहिले विधान असत्य आहे, पण दुसरे सत्य आहे

20. बा.सी. मर्ढेकरांच्या मते साहित्याचे माध्यम कोणते ?

(A) भावनार्थ
(B) भाषा
(C) शब्द
(D) विचार

21. जयवंत दळवी यांची 'चक्र' ही कादंबरी कोणत्या वाङ्‌मयीन संप्रदायात समाविष्ट होऊ शकेल ?

(A) अभिजातवाद
(B) स्वच्छंदतावाद
(C) अस्तित्ववाद
(D) वास्तववाद

22. लालजी पेंडसे यांचे लेखन पुढीलपैकी कोणकोणत्या समीक्षापद्धतीस सहाय्यभूत ठरु शकेल ?

(a) स्त्रीवादी समीक्षा
(b) मार्क्सवादी समीक्षा
(c) समाजशास्त्रीय समीक्षा
(d) मानसशास्त्रीय समीक्षा

(A) a आणि b
(B) b आणि c
(C) फक्त b
(D) c आणि d

23. पुढील समीक्षाग्रंथांचा कालक्रम सांगा :

(a) 'सौंदर्य आणि साहित्य'
(b) 'टीकाविवेक'
(c) टीकास्वयंवर
(d) रूपवेध

(A) a, d, b, c
(B) b, d, a, c
(C) a, c, d, b
(D) c, a, b, d

24. पुढीलपैकी कोणता शब्द शुद्धलेखनाच्या नियमांनुसार लिहिलेला आहे ?

(A) विधीनिषेध
(B) विधीनिशेध
(C) विधिनिषेध
(D) विधिनीषेध

**25.** या शब्दांची जात ओळखा :

म्हणून, कारण, तथापि, तरीही

(A) नाम

(B) सर्वनाम

(C) अव्यय

(D) विशेषण

**26.** भावेप्रयोगात क्रियापद __________ असते.

(A) कर्त्याप्रमाणे

(B) नपुसकलिंगी एकवचनी

(C) कर्माप्रमाणे

(D) नपुसकलिंगी अनेकवचनी

**27.** पुढील विभक्तींच्या कारकार्थासाठी विभक्तिप्रत्ययाप्रमाणेच शब्दयोगी अव्ययाचा देखील उपयोग केला जातो.

(A) पंचमी आणि सप्तमी

(B) तृतीया आणि षष्ठी

(C) पंचमी आणि षष्ठी

(D) सप्तमी आणि षष्ठी

**28.** 'सारासार' हा कोणता समास आहे?

(A) अव्ययीभाव

(B) कर्मधारय

(C) द्विगु

(D) द्वंद्व

**29.** बैल गेला आणि झोपा केला, या म्हणीच्या अर्थाचा योग्य पर्याय कोणता?

(A) अति झोपेमुळे नुकसान होणे

(B) नुकसान होऊन गेल्यावर प्रतिबंधक उपाय करणे

(C) दुष्काळामुळे दुर्दशा होणे

(D) गुराढोरांकडे दुर्लक्ष करणे

30. ‘शिमगा करणे’ ह्या वाक्प्रचाराच्या अर्थाचा योग्य पर्याय निवडा.

(A) शिमग्याचा उत्सव साजरा करणे (B) शिमग्यासाठी गावी जाणे

(C) शिवीगाळी करणे (D) फजिती करणे

31. सचिन तेंडुलकरांची मुलाखत घेताना कोणत्या विषयासंबंधी प्रश्न विचारणे अधिक उचित ठरेल?

(A) क्रिकेटमधील राजकारणाविषयी (B) क्रिकेटमधील सट्टेबाजीविषयी

(C) जाहिरातींविषयी (D) क्रिकेटमधील विक्रमांविषयी

32. वृत्तलेखन प्रभावी होण्याकरता पुढीलपैकी कोणत्या घटकास सर्वाधिक महत्त्व द्यावे?

(A) वाचकांची खुशामत करणे

(B) कमीत कमी जागेत जास्तीत जास्त तपशील देणे

(C) आलंकारिक भाषाशैली

(D) आकर्षक शीर्षक

33. पुढील अनुवादित साहित्यकृती आणि त्यांचे मूळ भाषेतील लेखक यांच्या जोड्या लावा :

(a) लज्जा (i) शेक्सपियर

(b) विकारविलसित (ii) एलिस रिबेरो

(c) देव जागा आहे (iii) तसलीमा नसरीन

(d) परवाना (iv) दोस्तोव्हस्की

(v) इब्सेन

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (A) | (iii), | (i), | (iv), | (ii) |
| (B) | (v), | (ii), | (v), | (iii) |
| (C) | (iv), | (v), | (iii), | (i) |
| (D) | (i), | (iii), | (i), | (v) |

**34.** पुढीलपैकी कोणत्या साहित्यकृती बंगालीमधून अनुवादित झालेल्या आहेत?

(a) सव्यसाची

(b) गृहदाह

(c) पर्व

(d) मानव-जन्माचे नाटक

(A) वरीलपैकी सर्व (B) वरीलपैकी a आणि b

(C) वरीलपैकी एकही नाही (D) c आणि d

**35.** पुढीलपैकी कोणत्या साहित्यिकाचे सर्व साहित्य मराठीत अनुवादित झालेले आहे?

(A) पूर्णचंद्र तेजस्वी

(B) आद्य रंगाचार्य

(C) गिरीश कर्नाड

(D) के.व्ही पुट्टप्पा

**36.** पुढीलपैकी कोणत्या पुस्तकाचा अनुवाद जास्तीत जास्त भारतीय भाषांमध्ये झालेला आहे?

(A) 'स्वामी' - रणजित देसाई

(B) 'मृत्युंजय' - शिवाजी सावंत

(C) 'माझी जन्मठेप' - वि.दा. सावरकर

(D) 'महानायक' - विश्वास पाटील

*पुढील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा.*

निरनिराळ्या कालखंडांतील साहित्यविचारांचे परिशीलन केले तर त्यावरूनही साहित्य आणि समाजजीवन यांचा संबंध किती दृढ असतो ते स्पष्ट होईल. ज्ञानेश्वर, तुकाराम, मोरोपंत, केशवसुत, मर्ढेकर, सुर्वे, नामदेव ढसाळ यांच्या साहित्यविषयक कल्पना सारख्या नाहीत. त्यांचा काळ वेगळा, त्यांची परिस्थिती वेगळी, त्यांच्या साहित्यनिर्मितीमागील प्रेरणाही वेगवेगळ्या आहेत. तेव्हा अक्षरसाहित्य, साहित्याचे शाश्वत मूल्य, या संकल्पनाही पारखून घेतल्या पाहिजेत. उच्च प्रतीच्या कलात्मक वाङ्मयाचा आस्वाद घेताना सहृदय व रसिक वाचक तल्लीन होऊन जातो. त्या तंद्रीत तो स्वत:लाही विसरतो. ' हर्ष खेद ते मावळले' अशी त्याची स्थिती होऊन तो कलानंदात निमग्न होतो. परंतु ही त्याची उन्मनी अवस्था फार काळ टिकत नाही. अल्पावकाशातच ती संपुष्टात येऊन तो वास्तवाच्या पातळीवर उतरतो. मग मात्र साहित्यातील कालसापेक्षतेचा अंश त्याचे लक्ष वेधून घेतो. साहित्यातील कालसापेक्ष व कालातीत आशय यांत तम:प्रकाशवत विरोध आहे ही समजूत निराधार आहे. सृष्टीतील क्षर आणि अक्षर तत्त्वांप्रमाणे साहित्यातील तात्कालिक व चिरंतन, क्षणिक व शाश्वत हे एकमेकांत मिसळलेले असतात. तसे पहिले तर असंख्य क्षणांच्या परिवर्तनशील प्रवाहात शाश्वत दडलेले असते. जे क्षणिक असते, तात्कालिक असते, त्याची दृढ पकड घेता आली, तरच शाश्वताचा मागोवा घेता येतो. क्षणाक्षणाचे अनुभव त्यांना आधारभूत असणाऱ्या जीवनप्रवाहापासून बाजूला काढले तर क्षणिक आणि शाश्वत हे दोन्ही रिते व अर्थशून्य होऊन जातील. शाश्वत मूल्य असलेल्या श्रेष्ठ साहित्याचा निर्माता उत्कट व उत्तुंग मनोवस्थेचे क्षण पकडूनच आपल्या प्रतिभासामर्थ्याने त्यातून एक सुश्लिष्ट कलाकृती तयार करत असतो. तिच्यापासून मिळणारा आनंद हा तिचे अंतरंग व बाह्यांग, तिच्यातील तात्कालिक व चिरंतन या सर्वांच्या मनोज्ञ मिलाफातून झालेला आनंद असतो. इतकेच नव्हे तर जे पुन्हा पुन्हा वाचावेसे वाटते अशा अक्षर वाङ्मयाचा रसिकाच्या मनावर जो कायमचा ठसा उमटतो, तो बहुतांशी आशयनिष्ठच असतो.

**37.** ज्ञानेश्वर, मोरोपंत, मर्ढेकर आणि नामदेव ढसाळ यांच्या साहित्यविषयक कल्पना सारख्या नाहीत कारण –

(A) त्यांच्या जीवनविषयक धारणा वेगवेगळ्या आहेत.

(B) त्यांच्या काळ, त्यांची परिस्थिती आणि त्यांच्या प्रेरणा वेगवेगळ्या आहेत.

(C) त्यांचे समाजातील स्थान वेगवेगळे आहे.

(D) त्यांच्या वैयक्तिक आवडीनिवडी वेगवेगळ्या आहेत.

**38.** कलावंताच्या तंद्रीचे वर्णन करताना वरील उताऱ्यात कोणाची काव्यपंक्ती उद्धृत केलेली आहे ?

(A) ज्ञानेश्वर (B) तुकाराम

(C) केशवसुत (D) बालकवी

**39.** अक्षरवाङ्मयाचा रसिकाच्या मनावरील ठसा कोणत्या प्रकारचा असतो ?

(A) आशयनिष्ठ (B) रूपनिष्ठ

(C) सौंदर्यनिष्ठ (D) तालबद्ध

**40.** वरील उताऱ्यात लेखकाचा दृष्टिकोन पुढीलपैकी कोणत्या प्रकारचा आहे ?

(A) कलावादी (B) जीवनवादी

(C) मार्क्सवादी (D) समन्वयवादी

**41.** आफ्रिकन दांपत्याचे मूल मराठी कुटुंबात वाढले तर प्रथम कोणती भाषा बोलू लागेल ?

(A) स्वाहिली

(B) मराठी

(C) मराठी-स्वाहिली यांचे मिश्रण असलेली

(D) इंग्लिश

**42.** बोलणे ही एक सामाजिक सवय असून तिच्या निर्मितीमागे पुढील घटक असतात.

(A) प्राणिसृष्टीचे निरीक्षण व शारीरिक गरज

(B) कौटुंबिक वातावरण व शालेय शिक्षण

(C) समाजांतर्गत निरीक्षण व अनुकरण

(D) जैविक गरजा व प्रारंभिक नातेसंबंध

**43.** मारुन मारुन > मारमारून ही प्रक्रिया कोणत्या प्रकारची आहे?

(A) समानवर्णपरिहार  (B) स्वरागम

(C) अक्षरव्याप्ती  (D) वर्णविपर्यय

**44.** भाषेचे खानिमिक विश्लेषण करताना वैधर्म्ययुक्त विनियोगाचे तत्त्व, पूरक विनियोगाचे तत्त्व आणि ध्वनिसाम्यतेचे तत्त्व यांचा आधार घेतला जातो.

(A) वरील विधानातील एकच तत्त्व बरोबर आहे.

(B) वरील विधानातील तिन्ही तत्त्वे बरोबर आहेत.

(C) वरील विधानातील दोनच तत्त्वे बरोबर आहेत.

(D) वरीलपैकी एकही तत्त्व बरोबर नाही.

**45.** अर्थ म्हणजे प्रतिमा ही भूमिका स्वीकारली तर पुढीलपैकी कोणत्या शब्दांच्या बाबतीत अडचण निर्माण होते?

(a) कुत्रा

(b) पळणे

(c) प्रेम

(d) सौजन्य

(A) वरीलपैकी a आणि b  (B) वरीलपैकी c आणि b

(C) वरीलपैकी a आणि c  (D) वरीलपैकी c आणि d

**46.** श्रवणबेळगोळ येथील शिलालेखाची दुसरी ओळ कोणती आहे?

(A) श्री चावुंडराजे करवियले

(B) श्री गंगराजे करवियले

(C) श्री गंगराजें सुत्ताले करवियले

(D) श्री चावुंडराये सुत्ताले करवियले

**47.** मराठीची कोणती बोली गुजरात आणि महाराष्ट्र यांच्या सीमाप्रदेशात बोलली जाते ?

(A) डांगी (B) अहिराणी

(C) वऱ्हाडी (D) नागपुरी

**48.** प्रमाण भाषा आणि बोली यांच्या व्याख्या करण्याच्या संदर्भात आकलन, विनिमय आणि इतिहास ही तीन तत्त्वे ध्यानात घ्यावी लागतात.

(A) वरील विधानातील एकच तत्त्व बरोबर आहे.

(B) वरील विधानातील सर्व तत्त्वे चुकीची आहेत.

(C) वरील विधानातील दोनच तत्त्वे बरोबर आहेत.

(D) वरील विधानातील सर्व तत्त्वे बरोबर आहेत.

**49.** पुरूष, अभिमान, हळद आणि उपास यांपैकी कोणते शब्द तद्‌भव आहेत ?

(A) पुरूष आणि हळद (B) अभिमान आणि उपास

(C) पुरूष आणि अभिमान (D) हळद आणि उपास

**50.** मराठीतील विरामचिन्हे ही __________ या भाषेमधून घेतलेली आहेत

(A) तमीळ (B) इंग्लिश

(C) संस्कृत (D) हिंदी

- o O o -

**Space For Rough Work**